8) **प्रकल्प नोंदणी:-** लिहून देणार यांनी रिअल इस्टेट रेग्युलेशन ॲन्ड डेव्हलपमेंट ॲक्ट 2016 नुसार वरील प्रकल्पाची नोंदणी केलेली असुन तीचा **नोंदणी क्र. P..... असा आहे.** लिहून देणार यांनी रियल इस्टेट रेग्युलेशन ॲन्ड डेव्हलपमेंट ॲक्ट 2016 नुसार सदरचा कररनामा लिहून घेणार यांचे लाभांत लिहून दिलेला आहे व रजिष्ट्रेशन ॲक्ट 1908 चे अधिन राहुन सह. दुय्यम निबंधक वर्ग-2 नाशिक यांचे कार्यालयात नोंदवून देत आहे.

9) **बांधीव भाग विक्रीचा अधिकार:-** वर कलम 1 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीवर लिहून देणार यांनी बांधकाम सुरु केलेल्या इमारतीतील बांधीव क्षेत्रांची विक्री करण्याचा अधिकार वरील नमुद केल्याप्रमाणे दिनांक 01/11/2018 रोजी नोंदविलेल्या खरेदीखतानुसार मालक या नात्याने मिळालेले आहे. त्या अनुषंगाने सदर इमारतीतील बांधीव भागांची विक्री लिहून देणार यांना करावयाची असुन लिहून घेणार यांना देखील सदर भागातच राहण्यासाठी फ्लॅट मिळकतीची आवश्यकता असल्याने लिहून घेणार यांना लिहून देणार यांचे इमारतीचे बांधकामाची माहीती झाली व त्यांनी लिहून देणार यांना मिळालेल्या मालकी हक्कांवदलची, मिळालेल्या परवानग्यांची व सर्व कागदपत्रांची पाहणी करुन स्वत:ची खात्री झालेनंतर आपसात बोलणी करुन अटी व शर्ती ठरवून कलम 2 मध्ये वर्णन केलेली मिळकत खरेदी करण्याचे ठरवून त्यानुसार प्रस्तुतचा करारनामा लिहून देणार हे लिहून घेणार यांचे लाभांत खालील अटी व शर्तींवर आजरोजी लिहून व नोंदवून देत आहे.

-:अटी व शर्ती:-

1) **मिळकतीची किंमत:-** वर कलम 2 मध्ये वर्णन केलेली फ्लॅट/सदनिका मिळकत लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना एकुण **किंमत रक्कम रुपये** ...../- **(अक्षरी रुपये** ..... **मात्र)** या एकुण किंमतीस खरेदी देतील. सदर किंमत ही लिहून घेणार व लिहून देणार यांचे संमतीने व समाधानाने ठरलेली असुन त्यास लिहून देणार यांची कुठलीही हरकत अगर तक्रार नाही. सदर किंमत ही परिशिष्ठात नमुद केलेल्या सुविधांसह ठरलेली आहे.

2) **किंमतीचा भरणा:-** वर कलम 2 मध्ये वर्णन केलेल्या मिळकतीच्या

किंमतीचा भरणा हा लिहून घेणार यांनी मिळकतीचे क्षेत्राचे मोजमाप करुन घेवून किंमत ठरविलेली आहे. तसेच क्षेत्रावावत उभयतांमध्ये कोणताही वाद अगर तक्रार नाही. लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालील दर्शविल्याप्रमाणे किंमतीचा भरणा द्यावयाचा आहे.

भरण्याचे प्रमाण	**तपशिल**
50%	आरसीसी काम 50% पुर्ण झाल्यानंतर
15%	विट वांधकाम 50% पुर्ण झाल्यानंतर
10%	विट वांधकाम 100% पुर्ण झाल्यानंतर
10%	प्लास्टरचे काम सुरु केल्यानंतर
10%	फ्लोअरींग चे काम सुरु केल्यानंतर
5%	कवजा देते वेळी
100%	मिळकतीचे एकुण किंमतीचा संपुर्ण मोवदला.

आजपावेतो लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना खालीलप्रमाणे भरणा दिलेला/द्यावयाचा आहे. सदरचा भरणा लिहून देणार यांना पावला आहे.

रक्कम	**तपशिल**
रु. ...../-	अक्षरी रक्कम रुपये ..... मात्र भरणा लिहून घेणार यांनी लिहून देणार यांना दिनांक ..... रोजी NEFT अन्वये त्यांच्या वॅंक खात्यावर अदा केलेला आहे.
रु. ...../-	अक्षरी रक्कम रुपये ..... मात्र लिहून घेणार हे लिहून देणार यांना वित्तीय संस्थेकडुन अगर वॅंकेकडुन कर्ज प्रकरण करुन वर नमुद केल्याप्रमाणे द्यावयाचे आहे ही वाव उभयतांना मान्य व कवुल आहे.

रु. ...../- एकुण अक्षरी रुपये ..... मात्र.

Scanned by CamScanner